महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर § ४४० ०२२
दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

जावक क्र.महाज्योती/UPSC/२०२३/२५७१ दि.२७.११.२०२३.

## परिपत्रक

**विषय : महाज्योतीमार्फत UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेचा सुधारित उत्तरतालिकेनुसार सुधारित निकाल व प्रारूप निवड यादी जाहीर करण्याबाबत.**

१) महाज्योतीमार्फत UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी दि.२९ ऑक्टोबर २०२३ व दि.०४ नोव्हेंबर २०२३ रोजी चाळणी परीक्षा एकूण ४ टप्प्यात घेण्यात आलेली होती.

२) सदर चाळणी परीक्षेचा बैठक क्रमांकानुसार प्रारूप निकाल व ज्या आधारावर निकाल तयार करण्यात आला अशी उत्तरतालिका ही दि.१६ नोव्हेंबर २०२३ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेली होती.

३) मात्र ज्या आधारावर निकाल तयार करण्यात आला अश्या उत्तरतालिकेवर देखील काही विद्यार्थ्यांनी आक्षेप नोंदवले होते, त्या आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी परीक्षा एजन्सीला महाज्योती प्रशासनाने सूचना दिलेल्या होत्या.

४) परीक्षा एजन्सीने UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी घेण्यात आलेल्या खालील प्रश्नसंच व प्रश्नक्रमांकावरील प्रश्नांची भाषा व त्यांची उत्तरे संदिग्ध असल्याने सदर प्रश्न रद्द करून त्या प्रश्नांचे बोनस गुण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे:

| अ क्र. | प्रश्नपत्रिका संच क्रमांक | प्रश्न क्रमांक | घेण्यात आलेला निर्णय |
|---|---|---|---|
| १ | प्रश्नपत्रिका संच क्रमांक १ | ४६ | बोनस गुण देण्यात येत आहे. |
| २ | प्रश्नपत्रिका संच क्रमांक २ | ५३ | बोनस गुण देण्यात येत आहे. |
| ३ | प्रश्नपत्रिका संच क्रमांक २ | ६४ | बोनस गुण देण्यात येत आहे. |
| ४ | प्रश्नपत्रिका संच क्रमांक २ | ७२ | बोनस गुण देण्यात येत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | प्रश्नपत्रिका संच क्रमांक २ | ८२ | बोनस गुण देण्यात येत आहे. |

५) <u>महत्वाचे :</u> सुधारित उत्तरतालिकेमध्ये काही प्रश्नांच्या उत्तरात बदल झाल्यामुळे व बोनस मार्क देण्यात आल्यामुळे काही विद्यार्थ्यांचे गुण वाढू शकतात. या बदललेल्या मूळ गुणांच्या आधारे नॉर्मलायझेशन करण्यात आल्यामुळे जरी एखाद्या विद्यार्थ्याचे मूळ गुणांमध्ये वाढ झाली नाही तरी पूर्वीचे नॉर्मलाईज गुण आणि आताच्या सुधारित निकालामधील नॉर्मलाईज गुण यामध्ये बदल होवू शकतो, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

६) UPSC, MPSC आणि MPSC (संयुक्त गट ब व क) या तीनही प्रशिक्षणासाठी घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांचा निकाल लावताना वरील प्रमाणे एकच नॉर्मलायझेशनचे सूत्र वापरण्यात येत आहे. त्यामुळे विशिष्ट चाळणी परीक्षेकरिता नॉर्मलायझेशन योग्य सूत्राद्वारे करण्यात आले व विशिष्ट परीक्षेकरिता वेगळे सूत्र वापरण्यात आले, असा कोणताही गैरसमज विद्यार्थ्यांनी मनात बाळगू नये.

७) महाज्योतीचे परिपत्रक क्रमांक महाज्योती/नागपूर/ आस्था/ २४९६/२०२३-२४ दि.१६.११.२०२३ मध्ये नमूद केलेले गुणांचे Normalization करण्याबाबत सूत्र सुधारित निकाल जाहीर करताना वापरण्यात आलेले आहे.

८) वरील सर्व बाबी विचारात घेता महाज्योतीमार्फत UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेचा सुधारित उत्तरतालिकेनुसार सुधारित निकाल व प्रारूप निवड यादी जाहीर करण्यात येत आहे.

याबाबत खालील प्रमाणे बाबी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे :

a) यापूर्वी महाज्योतीचे प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांची नावे निकालातून वगळण्यात आलेली असून त्यांची यादी स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

b) संवर्ग निहाय यादी सारथी संस्थेला पाठवून सारथी संस्थेकडून लाभ घेतलेल्या उमेदवारांची नावे वगळण्यात येतील.

c) उमेदवारांचे लिंग, नाव, प्रवर्ग, दिव्यांग व अनाथ अशा नोंदणी बाबत अर्ज भरतांना चूक झाल्यास विद्यार्थ्यांनी ही बाब तातडीने महाज्योतीच्या निदर्शनास आणून द्यावी.

d) यासह सदर परीक्षेकरिता अर्ज केलेल्या दिव्यांग व अनाथ उमेदवार म्हणून नोंद केलेल्या विद्यार्थ्यांची यादी स्वतंत्रपणे संलग्न करण्यात येत आहे.

e) दिव्यांग उमेदवारांनी त्यांच्या नावापुढे खालील प्रमाणे माहिती नमूद करावी. (संदर्भ : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक§दिव्यांग २०२२/ प्र.क्र.८३/१६ अ दिनांक २९ मे २०१९ नुसार.)

अ) अंध / अल्पदृष्टी

ब) कर्णबधिरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता

क) अस्थिभंगता/मेंदूचा पक्षघात (Cerebral Palsy)/ कुष्ठरोग मुक्त (Leprosy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism)/ आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायू विकृती (Muscular dystrophy)

ड) स्वमग्नता (Autism)/ मंदबुद्धी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Specific learning disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Intellectual Disability) /मानसिक आजार

इ ) वरील दिव्यांग प्रकार (अ) ते (ड) मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी. (उपरोक्त प्रमाणे -अ -ब -क -ड अथवा इ अशी नोंद करावी)

f) उमेदवाराने -अनाथ नमूद करून अर्ज केला असल्यास आपल्या नावापुढे -संस्थात्मक किंवा -संस्थाबाह्य अशी नोंद करून प्रमाणपत्र संलग्न करावे. (संस्थात्मक असेल तर “अ” अथवा संस्थाबाह्य असेल तर “ब” अशी नोंद करावी)

g) विद्यार्थ्यांकडून माहिती प्राप्त होताच दिव्यांग आणि अनाथ प्रवर्गातून प्रशिक्षणाकरिता निवड झालेल्या उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

h) UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता खालील प्रमाणे मराठी माध्यमातून प्रशिक्षण घेण्यासाठी दोन प्रशिक्षण संस्था आणि इंग्रजी माध्यमातून प्रशिक्षण घेण्यासाठी एक प्रशिक्षण संस्था उपलब्ध आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना संस्था निवडण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी दिनांक ३०/११/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० पर्यंत संस्थेची निवड करावी.

i) प्रत्येक संस्थेची प्रवेश क्षमता (उपलब्ध जागा) खालील तक्त्यात दर्शिवल्यानुसार आहेत. विद्यार्थ्यांना जर मागणी केलेल्या प्रशिक्षण संस्थेत संख्याधिक्यामुळे प्रशिक्षण देणे शक्य नसल्यास विद्यार्थ्यांना दुसऱ्या संस्थेला संलग्न करण्यात येईल. याकरिता विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षेत प्राप्त गुणांचा विचार केला जाईल.

| अ. क्र. | संस्था | पत्ता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|
| १ | युनिक ॲकडमी पुणे (मराठी माध्यम ) | द युनिक अकॅडेमी, ३९, वास्तु चेंबर्स, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मेन गेट समोर, शिरोळे रोड, शिवाजी नगर, पुणे | ३७५ |
| २ | ज्ञानदीप ॲकडमी पुणे (मराठी माध्यम ) | ७ वा मजला, T.C.G. बिल्डिंग, अलका टॉकीज समोर, अलका टॉकीज चौक, टिळक रोड सदाशिव पेठ, पुणे. | ३७५ |
| ३ | श्रीराम आयएस (इंग्रजी माध्यम ) | ओल्ड राजेंद्र नगर ,दिल्ली | १००० |

जर विद्यार्थ्यांनी त्यांचे लिंग पुरुष ऐवजी स्त्री निवडले असेल व त्यांची निवड महिला संवर्गा मध्ये झालेली असेल तर अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील.

तरी संबंधितांनी उपरोक्त सुचनांची नोंद घ्यावी .

(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण
संस्था,(महाज्योती), नागपुर.

# स्वयं घोषणापत्र

मी ________________________________________स्वयं घोषणापत्र लिहून देतो की माझी निवड महाज्योती द्वारा आयोजित ____________________ प्रशिक्षणाकरिता झालेली आहे. या अनुषंगाने मी खालील बाबींबाबत स्वयं घोषणापत्र लिहून देत आहे.

१) मी यापूर्वी महाज्योतीच्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतलेला नाही.

२) तसेच मी यापूर्वी सारथी द्वारा आयोजित कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतलेला नाही.

३) तसेच मी सद्यस्थितीत SIAC या संस्थेद्वारा चालू असणाऱ्या प्रशिक्षणाचा प्रशिक्षणार्थी नाही.

४) मी स्वयं घोषणापत्र लिहून देतो की, मी महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये सध्या कार्यरत नाही. तसेच मी कोणत्याही कंपनीमध्ये पगारी पदावर कार्यरत नाही.

तसेच मी स्वयं घोषणापत्र लिहून देतो की, कोणत्याही शासकीय पदाकरिता निवड झालेली नाही तसेच माझी निवड झाल्यास मी हा प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करेन प्रशिक्षण कार्यक्रम अर्ध्यावर सोडणार नाही. प्रशिक्षण कार्यक्रम जर मी अर्ध्यावर सोडला तर प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान दिल्या जाणारे विद्यावेतन, आकस्मिक निधी व प्रशिक्षण संस्थेला देय असलेली प्रशिक्षण शुल्काची रक्कम ही माझ्याकडून वसुली पात्र असेल. मी शपथपूर्वक लिहून देतो की उपरोक्त प्रमाणे दिलेली सर्व माहिती खरी आहे यामध्ये कोणतीही माहिती चुकीची आढळल्यास मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र ठरेन .

दिनांक : विद्यार्थ्यांचे नाव :

ठिकाण : विद्यार्थ्यांची स्वाक्षरी :

मो. क्र .

आधार क्र.